www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide

Test Booklet Code & Serial No.
प्रश्नपत्रिका कोड व क्रमांक

**B**

# Paper-II
# PHILOSOPHY

**Signature and Name of Invigilator**

1. (Signature) ..........................................

(Name) ..........................................

2. (Signature) ..........................................

(Name) ..........................................

Seat No. [ ] (In figures as in Admit Card)

Seat No. .......................................................... (In words)

OMR Sheet No. [ ] (To be filled by the Candidate)

## JUN - 12225

**Time Allowed : 2 Hours]** **[Maximum Marks : 200**

Number of Pages in this Booklet : **36** Number of Questions in this Booklet : **100**

### Instructions for the Candidates

1. Write your Seat No. and OMR Sheet No. in the space provided on the top of this page.
2. This paper consists of **100** objective type questions. Each question will carry *two* marks. *All* questions of Paper II will be compulsory.
3. At the commencement of examination, the question booklet will be given to the student. In the first 5 minutes, you are requested to open the booklet and compulsorily examine it as follows :
   - (*i*) To have access to the Question Booklet, tear off the paper seal on the edge of this cover page. Do not accept a booklet without sticker-seal or open booklet.
   - (*ii*) Tally the number of pages and number of questions in the booklet with the information printed on the cover page. Faulty booklets due to missing pages/questions or questions repeated or not in serial order or any other discrepancy should not be accepted and correct booklet should be obtained from the invigilator within the period of 5 minutes. Afterwards, neither the Question Booklet will be replaced nor any extra time will be given. The same may please be noted.
   - (*iii*) After this verification is over, the OMR Sheet Number should be entered on this Test Booklet.
4. Each question has four alternative responses marked (A), (B), (C) and (D). You have to darken the circle as indicated below on the correct response against each item.

   **Example :** where (B) is the correct response.

   (A) ● (C) (D)

   Following wrong methods should not be used as they are not recognised by scanning machine in digitized assessment. Candidate using such method will be responsible for their loss.

   WRONG METHODS

   

5. Your responses to the items are to be indicated in the **OMR Sheet given inside the Booklet only.** If you mark at any place other than in the circle in the OMR Sheet, it will not be evaluated.
6. Read instructions given inside carefully.
7. Rough Work is to be done at the end of this booklet.
8. If you write your Name, Seat Number, Phone Number or put any mark on any part of the OMR Sheet, except for the space allotted for the relevant entries, which may disclose your identity, or use abusive language or employ any other unfair means, you will render yourself liable to disqualification.
9. You have to return original OMR Sheet to the invigilator at the end of the examination compulsorily and must not carry it with you outside the Examination Hall. You are, however, allowed to carry the Test Booklet and duplicate copy of OMR Sheet on conclusion of examination.
10. Use only Blue/Black Ball point pen.
11. Use of any calculator or log table, etc., is prohibited.
12. There is no negative marking for incorrect answers.

### विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाच्या सूचना

1. परीक्षार्थींनी आपला आसन क्रमांक या पृष्ठावरील वरच्या कोपऱ्यात लिहावा. तसेच आपणांस दिलेल्या उत्तरपत्रिकेचा क्रमांक त्याखाली लिहावा.
2. सदर प्रश्नपत्रिकेत 100 बहुपर्यायी प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नास **दोन** गुण आहेत. या प्रश्नपत्रिकेतील **सर्व** प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे.
3. परीक्षा सुरू झाल्यावर विद्यार्थ्याला प्रश्नपत्रिका दिली जाईल. सुरुवातीच्या 5 मिनिटांमध्ये आपण सदर प्रश्नपत्रिका उघडून खालील बाबी अवश्य तपासून पहाव्यात.
   - (*i*) प्रश्नपत्रिका उघडण्यासाठी प्रश्नपत्रिकेवर लावलेले सील उघडावे. सील नसलेली किंवा सील उघडलेली प्रश्नपत्रिका स्वीकारू नये.
   - (*ii*) पहिल्या पृष्ठावर नमूद केल्याप्रमाणे प्रश्नपत्रिकेची एकूण पृष्ठे तसेच प्रश्नपत्रिकेतील एकूण प्रश्नांची संख्या पडताळून पहावी. पृष्ठे कमी असलेली/कमी प्रश्न असलेली/प्रश्नांचा चुकीचा क्रम असलेली किंवा इतर त्रुटी असलेली सदोष प्रश्नपत्रिका सुरुवातीच्या 5 मिनिटातच पर्यवेक्षकाला परत देऊन दुसरी प्रश्नपत्रिका मागवून घ्यावी. त्यानंतर प्रश्नपत्रिका बदलून मिळणार नाही तसेच वेळही वाढवून मिळणार नाही याची कृपया विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.
   - (*iii*) वरीलप्रमाणे सर्व पडताळून पाहिल्यानंतरच प्रश्नपत्रिकेवर ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेचा नंबर लिहावा.
4. प्रत्येक प्रश्नासाठी (A), (B), (C) आणि (D) अशी चार विकल्प उत्तरे दिली आहेत. त्यातील योग्य उत्तराचा रकाना खाली दर्शविल्याप्रमाणे ठळकपणे काळा/निळा करावा.

   **उदा. :** जर (B) हे योग्य उत्तर असेल तर.

   (A) ● (C) (D)

   खालील चुकीच्या पद्धती वापरू नये, कारण डिजिटाइज्ड (Digitized) मूल्यांकनात स्कॅनिंग मशीन त्यांना ओळखत नाही. त्या पद्धती वापरून नुकसान झाल्यास त्यास विद्यार्थीच जबाबदार असतील.

   WRONG METHODS

   

5. या प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांची उत्तरे **ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेतच दर्शवावीत.** इतर ठिकाणी लिहिलेली उत्तरे तपासली जाणार नाहीत.
6. आत दिलेल्या सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात.
7. प्रश्नपत्रिकेच्या शेवटी जोडलेल्या कोऱ्या पानावरच कच्चे काम करावे.
8. जर आपण ओ.एम.आर. वर नमूद केलेल्या ठिकाणाव्यतिरिक्त इतर कोठेही नाव, आसन क्रमांक, फोन नंबर किंवा ओळख पटेल अशी कोणतीही खूण केलेली आढळून आल्यास अथवा असभ्य भाषेचा वापर किंवा इतर गैरमार्गांचा अवलंब केल्यास विद्यार्थ्याला परीक्षेस अपात्र ठरविण्यात येईल.
9. परीक्षा संपल्यानंतर विद्यार्थ्याने मूळ ओ.एम.आर. उत्तरपत्रिका पर्यवेक्षकांकडे परत करणे आवश्यक आहे. तथापि, प्रश्नपत्रिका व ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेची द्वितीय प्रत आपल्याबरोबर नेण्यास विद्यार्थ्यांना परवानगी आहे.
10. फक्त निळ्या किंवा काळ्या बॉल पेनचाच वापर करावा.
11. कॅलक्युलेटर किंवा लॉग टेबल वापरण्यास परवानगी नाही.
12. चुकीच्या उत्तरासाठी गुण कपात केली जाणार नाही.

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



Your Personal Exam Guide

www.prepp.in

JUN - 12225/II—B

# Philosophy
## Paper II
# दर्शनशास्त्र
## प्रश्नपत्रिका II

**Time Allowed : 120 Minutes]** **[Maximum Marks : 200**

**Note :** This paper contains **Hundred (100)** multiple choice questions. Each question carrying **Two (2)** marks. Attempt *All* questions.

**सूचना :** या प्रश्नपत्रिकेत एकूण **शंभर (100)** बहुपर्यायी प्रश्न दिलेले आहेत. प्रत्येक प्रश्नाला **दोन (2)** गुण आहेत. **सर्व** प्रश्न सोडवा.

1. Match the pairs :

**List-I**

**Puruṣārthas**

(*a*) Dharma

(*b*) Artha

(*c*) Kāma

(*d*) Mokṣa

**List-II**

**Nature of the goal**

(*i*) Material

(*ii*) Spiritual

(*iii*) Ethical

(*iv*) Hedonistic

| | (*a*) | (*b*) | (*c*) | (*d*) |
|---|---|---|---|---|
| (A) | (*iv*) | (*i*) | (*ii*) | (*iii*) |
| (B) | (*i*) | (*iii*) | (*ii*) | (*iv*) |
| (C) | (*iii*) | (*i*) | (*iv*) | (*ii*) |
| (D) | (*iv*) | (*i*) | (*iii*) | (*ii*) |

1. जोड्या जुळवा :

**गट–I**

**पुरुषार्थ**

(*a*) धर्म

(*b*) अर्थ

(*c*) काम

(*d*) मोक्ष

**गट–II**

**साध्यस्वरूप**

(*i*) भौतिक

(*ii*) आध्यात्मिक

(*iii*) नैतिक

(*iv*) सुखवादी

| | (*a*) | (*b*) | (*c*) | (*d*) |
|---|---|---|---|---|
| (A) | (*iv*) | (*i*) | (*ii*) | (*iii*) |
| (B) | (*i*) | (*iii*) | (*ii*) | (*iv*) |
| (C) | (*iii*) | (*i*) | (*iv*) | (*ii*) |
| (D) | (*iv*) | (*i*) | (*iii*) | (*ii*) |

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



2. The concept of Paṅcamahāyajña includes :

(A) mere study of scriptures

(B) mere offerings

(C) scriptural study and offerings

(D) devotion to the Abstract

3. As stated in the Bhagavad gītā and gītārahasya , Lokasaṁgraha is possible :

(A) only once in a lifetime

(B) only after death

(C) by meditation

(D) and promoted even by Jñanī

4. Mokṣa , according to Cārvākas, is nothing but :

(A) Life as well as death

(B) Death as well as freedom

(C) Freedom as well as Bliss

(D) Death as well as birth

5. The concept of 'Sanyama' in the Yoga-sūtras excludes :

(A) Dhāraṇā

(B) Dhyāna

(C) Samādhi

(D) Pratyāhāra

2. 'पंचमहायज्ञ' ह्या संकल्पनेत समाविष्ट असते :

(A) केवळ शास्त्राध्ययन

(B) केवळ दान व अर्पण

(C) शास्त्राध्ययन व दान-अर्पण

(D) अमूर्त-भक्ती

3. भगवद्‌गीता व गीतारहस्यात म्हटल्याप्रमाणे लोकसंग्रह शक्य आहे :

(A) जीवनात फक्त एकदा

(B) केवळ मृत्युनंतर

(C) ध्यानाने

(D) व ज्ञानी पुरुषांकडून साधला जातो

4. चार्वाकांच्या मते, मोक्ष म्हणजे :

(A) जीवन आणि मृत्यूही

(B) मृत्यू आणि स्वातंत्र्यही

(C) स्वातंत्र्य आणि परमानंदही

(D) मृत्यू आणि जन्म

5. 'संयम' ह्या योगसूत्रातील संकल्पनेत कशाचा अंतर्भाव होत नाही ?

(A) Dhāraṇā

(B) Dhyāna

(C) Samādhi

(D) Pratyāhāra

6. Yogasūtras regard Samādhi as the pen-ultimate goal and the ultimate goal is :
   (A) Kaivalya
   (B) Mokṣa
   (C) Apavarga
   (D) Nirvāṇa

7. As stated in the Dhammapada, for the sustenance of the society, relationships cannot be based on :
   (A) Enmity
   (B) Non-co-operation
   (C) Anarchy
   (D) Absurdity

8. In Indian Philosophy, we find that the law of karma is rejected :
   (A) Only by Cārvākas
   (B) by no school whatsoever
   (C) by all heterodox schools
   (D) only by atheistic schools

6. 'समाधी' हे योगसूत्रातील उपांत्य साध्य तर अंतिम साध्य हे असते :
   (A) कैवल्य
   (B) मोक्ष
   (C) अपवर्ग
   (D) निर्वाण

7. धम्मपदात म्हटल्याप्रमाणे, समाजधारणेसाठी नातेसंबंध कशावर आधारलेले नसावेत ?
   (A) वैर
   (B) असहकार्य
   (C) अराजक
   (D) असंगती

8. भारतीय तत्त्वज्ञानात, कर्मसिद्धांत नाकारला तो :
   (A) फक्त चार्वाकांनी
   (B) अगदी कोणत्याही दर्शनाने नाही
   (C) सर्व नास्तिक दर्शनांनी
   (D) केवळ निरीश्वरवादी दर्शनांनी

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



9. Yogakṣema, as maintained in the Bhagavad-gītā, is carried on by :
   (A) Brahmā
   (B) Nirguṇa Brahman
   (C) Apūrva
   (D) Lord

10. Which one is not included in Triratna ?
   (A) Samyak Bhāva
   (B) Samyak Darshana
   (C) Samyak Charitra
   (D) Samyak Jñāna

11. In Kant's moral philosophy, ......... is not a moral postulate.
   (A) Freedom of will
   (B) Faith in the existence of devil
   (C) Imortality of soul
   (D) Faith in the existence of God

12. Etymologically, the meaning of the term 'right' is ...........
   (A) According to law
   (B) According to desire
   (C) Elder person's advice
   (D) According to religious law

9. भगवद्गीतेच्या म्हणण्यानुसार योगक्षेम चालवणारा हा असतो :
   (A) ब्रह्मा
   (B) निर्गुण ब्रह्म
   (C) अपूर्व
   (D) ईश्वर

10. त्रिरत्नात कोणाचा समावेश नाही ?
   (A) सम्यक् भाव
   (B) सम्यक् दर्शन
   (C) सम्यक् चरित्र
   (D) सम्यक् ज्ञान

11. कांटच्या नैतिक तत्त्वज्ञानात, ......... हे नैतिक गृहीत तत्त्व नाही.
   (A) संकल्पस्वातंत्र्य
   (B) दुष्टात्म्याच्या अस्तित्वावर श्रद्धा
   (C) आत्म्याचे अमरत्व
   (D) ईश्वर अस्तित्वावरील श्रद्धा

12. शब्दोत्पत्तीशास्त्रानुसार, 'योग्य' या पदाचा अर्थ असा आहे ..............
   (A) नियमानुसार
   (B) इच्छेनुसार
   (C) वडीलधाऱ्या व्यक्तीच्या सल्ल्यानुसार
   (D) धार्मिक नियमानुसार

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



13. The study of ultimate objectives and outcome is ...........

(A) Deontology

(B) Business Ethics

(C) Teleology

(D) Naturalism

14. According to Kant, there are ......... categorical imperatives.

(A) Two

(B) Three

(C) Four

(D) Six

15. "The ethical theory connot account for the fact and disagreement in ethics" is .............

(A) Super-naturalism

(B) Objectivism

(C) Non-naturalism

(D) Subjectivism

16. Those offences against society which are recognised by national law, and which are liable to punishment are known as .............

(A) Crime

(B) Sin

(C) Misbehaviour

(D) Non-moral actions

13. अंतिम उद्देश आणि परिणाम यांचे अध्ययन म्हणजे :

(A) कर्तव्यवाद

(B) व्यापार नीतिशास्त्र

(C) प्रयोजनवाद

(D) निसर्गवाद

14. कांटच्या मतानुसार, निरपेक्ष आदेश ......... आहेत.

(A) दोन

(B) तीन

(C) चार

(D) सहा

15. नीतिशास्त्रात असहमतीची शक्यता मान्य न करणारी नीतिशास्त्रीय उपपत्ती ही आहे......

(A) अति प्राकृतिकतावाद

(B) वस्तुनिष्ठतावाद

(C) न-निसर्गवाद

(D) व्यक्तिनिष्ठतावाद

16. समाजाविरोधातील अशी अपकृत्ये जी राज्याच्या कायद्यांतर्गत येतात आणि ज्याबद्दल शिक्षा होवू शकते, त्यास ................ असे म्हणतात.

(A) अपराध

(B) पाप

(C) गैरवर्तणूक

(D) न-नैतिक कृती

17. Which of the following theories maintains the view that pleasure is the ultimate good ?
    (A) Hedonism
    (B) Deontological theories
    (C) Eudamonia ethics
    (D) Emotivism

18. Whom according to the following philosophers, man should carry out activities yielding the maximum pleasure, without making qualitative distinction ?
    (A) Mill
    (B) Spencer
    (C) Bentham
    (D) Kant

19. Ethical subjectivism is ..........
    (A) A cognitivist theory
    (B) A non-cognitivist theory
    (C) A kind of emotivism
    (D) Prescriptivism

20. The term "metaethics" was coined by :
    (A) Moore
    (B) Russell
    (C) Ayer
    (D) Wittgenstein

17. खालीलपैकी कोणती उपपत्ती असे मान्य करते की सुख हे अंतिम शुभ आहे ?
    (A) सुखवाद
    (B) कर्तव्यवादी उपपत्ती
    (C) सर्वहितवादी नीतिशास्त्र
    (D) भावनिकवाद

18. खालीलपैकी कोणत्या तत्त्वज्ञानुसार गुणभेदाचा विचार न करता ज्या कृतीतून जास्तीत जास्त सुखाची निर्मिती होईल अशा कृती करायला पाहिजे ?
    (A) मिल
    (B) स्पेन्सर
    (C) बेंथम
    (D) कांट

19. नीतिशास्त्रीय व्यक्तिनिष्ठतावाद ....... हे आहे.
    (A) ज्ञानात्मकतावाद
    (B) न-ज्ञानात्मकतावाद
    (C) भावनिकवादाचा एक प्रकार
    (D) आदेशवाद

20. 'अधिनीतिशास्त्र' या संज्ञेची प्रस्तुती प्रथमत: यांनी केली :
    (A) मूर
    (B) रसेल
    (C) एयर
    (D) विट्गेन्स्टाईन

www.prepp.in
Prepp
Your Personal Exams Guide



21. The universal religion, according to Swami Vivekananda, is attained by what is called :
(A) Dharma
(B) Nīti
(C) Yoga
(D) Saṁnyāsa

22. Life is joy, according to Tagore, because of :
(A) Brahman
(B) Finite-infinite
(C) Jīvana-devatā
(D) God

23. "Love, sacrifice, sincerity, spontaneity and innocence constitute religious life" is maintained not only by J. Krishnamurti but also by :
(A) K. C. Bhattacharya
(B) Rabindranath Tagore
(C) S. Radhakrishnan
(D) Mahatma Gandhi

24. Intuition is not the property of intellect, as maintained by Iqbal, but of the :
(A) Head
(B) Soul
(C) Heart
(D) Complete system

21. स्वामी विवेकानंदांच्या मते, वैश्विक धर्म कसा साधला जातो ?
(A) धर्माने
(B) नीतीने
(C) योगाने
(D) संन्यासाने

22. टागोरांच्या मते, आनंदमय जीवनास कारणीभूत असते :
(A) ब्रह्म
(B) सान्त-अनन्त
(C) जीवन-देवता
(D) ईश्वर

23. "प्रेम, त्याग, प्रामाणिकपणा, उत्स्फूर्तता व निरागसता धार्मिक जीवन साकारतात" असे जे. कृष्णमूर्ती व ............ म्हणतात.
(A) के.सी. भट्टाचार्य
(B) रवीन्द्रनाथ टागोर
(C) स. राधाकृष्णन
(D) महात्मा गांधी

24. अंतर्ज्ञान हा, इक्बालांच्या मते, बुद्धीचा गुण नसून तो गुण आहे :
(A) डोक्याचा
(B) आत्म्याचा
(C) हृदयाचा
(D) संपूर्ण व्यवस्थेचा

www.prepp.in
Prepp
Your Personal Exams Guide



25. S. Radhakrishnan holds that the ultimate human destiny is :

(A) Universal redemption

(B) Individual redemption

(C) Unintelligible

(D) Incorrigible

26. Match the pairs :

**List-I**

(*a*) Mahatma Gandhi

(*b*) K.C. Bhattacharya

(*c*) S. Radhakrishnan

(*d*) J. Krishnamurti

**List-II**

(*i*) Swaraj in ideas

(*ii*) Hind-Swaraj

(*iii*) Freedom from the known

(*iv*) Idealist view of life

| | (*a*) | (*b*) | (*c*) | (*d*) |
|---|---|---|---|---|
| (A) | (*ii*) | (*iv*) | (*iii*) | (*i*) |
| (B) | (*iv*) | (*i*) | (*ii*) | (*iii*) |
| (C) | (*ii*) | (*i*) | (*iv*) | (*iii*) |
| (D) | (*ii*) | (*iv*) | (*i*) | (*iii*) |

25. सर्वपल्ली राधाकृष्णनांच्या म्हणण्यानुसार, अंतिम मानवी भागधेय म्हणजे :

(A) सर्वमुक्ती

(B) वैयक्तिक मुक्ती

(C) अनाकलनीय

(D) अस्खलनीय

26. जोड्या जुळवा :

**पहिला गट**

(*a*) महात्मा गांधी

(*b*) के.सी. भट्टाचार्य

(*c*) स. राधाकृष्णन

(*d*) जे. कृष्णमूर्ती

**दुसरा गट**

(*i*) स्वराज इन आयडिआज

(*ii*) हिंद-स्वराज

(*iii*) फ्रीडम फ्रॉम द नोन

(*iv*) आइडिऑलिस्ट व्ह्यू ऑफ लाइफ

| | (*a*) | (*b*) | (*c*) | (*d*) |
|---|---|---|---|---|
| (A) | (*ii*) | (*iv*) | (*iii*) | (*i*) |
| (B) | (*iv*) | (*i*) | (*ii*) | (*iii*) |
| (C) | (*ii*) | (*i*) | (*iv*) | (*iii*) |
| (D) | (*ii*) | (*iv*) | (*i*) | (*iii*) |

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



27. "One caste, one Religion, One God for human being". This principle was recommended by :

(A) Dr. Ambedkar

(B) Pt. Deendayal Upadhyaya

(C) Sree Narayan Guru

(D) Mahatma Gandhi

28. According to Gandhi :

(A) Ahimsa is the means and Truth is the end

(B) Ahimsa is the end and Truth is the means

(C) Ahimsa and Truth, both are means to a higher goal

(D) Ahimsa and Truth, both are ends in themselves

29. The principle of Pandit Deendayal Upadhyaya is recognized as :

(A) Ekatma Manav Darshan

(B) Ekatma Rashtra Darshan

(C) Ekatma Vedanta Darshan

(D) Ekatma Bharatiya Darshan

27. "मानवासाठी एक जात, एक धर्म, एक ईश्वर" या तत्वाचा पुरस्कार यांनी केला" :

(A) डॉ. आंबेडकर

(B) पं. दीनदयाल उपाध्याय

(C) श्रीनारायण गुरू

(D) महात्मा गांधी

28. गांधीजींच्या मतानुसार :

(A) अहिंसा हे साधन व सत्य हे साध्य होय

(B) अहिंसा हे साध्य व सत्य हे साधन होय

(C) अहिंसा व सत्य ही दोन्ही एका उच्चतर साध्याची साधने होत

(D) अहिंसा व सत्य ही दोन्ही साध्ये आहेत

29. पं. दीनदयाल उपाध्याय यांचे तत्त्व या नावाने ओळखले जाते :

(A) एकात्म मानव दर्शन

(B) एकात्म राष्ट्र दर्शन

(C) एकात्म वेदान्त दर्शन

(D) एकात्म भारतीय दर्शन

30. Dhananjay Keer, Phule's biographer, noted him as the father of :
(A) Religious revolution
(B) Indian social revolution
(C) Indian educational revolution
(D) Indian economic revolution

31. In Russell's metaphysics, material objects are :
(A) Ideas
(B) Illusion
(C) Constructed
(D) Not constructed

32. In Wittgenstein's Tractatus, simple objects are :
(A) Non-existing entities
(B) Existing entities
(C) Abstract entities
(D) Linguistic entities

33. According to Later Wittgenstein, the task of logical analysis is :
(A) To describe the world
(B) To discover elementary proposition
(C) To re-construct the logical structure of language
(D) To look at the grammatical forms of language

30. फुले यांचे चरित्रकार धनंजय कीर यांनी त्यांचा उल्लेख .......... चे जनक असा केला आहे.
(A) धार्मिक क्रांती
(B) भारतीय सामाजिक क्रांती
(C) भारतीय शैक्षणिक क्रांती
(D) भारतीय आर्थिक क्रांती

31. रसेलच्या सत्ताशास्त्रानुसार भौतिक वस्तू या ....... असतात.
(A) कल्पना
(B) भ्रम
(C) संरचित
(D) अ-संरचित

32. विट्‌गेनस्टाईनच्या 'ट्रॅक्टॅटस' नुसार सरल वस्तू या ........... असतात.
(A) अस्तित्व विरहित वस्तू
(B) अस्तित्वात असणाऱ्या वस्तू
(C) अमूर्त वस्तू
(D) भाषिक वस्तू

33. उत्तरकालीन विट्‌गेनस्टाईनच्या मतानुसार, तार्किक विश्लेषणाचे कार्य हे असते :
(A) जगाचे वर्णन करणे
(B) प्राथमिक विधानांचा शोध घेणे
(C) भाषेच्या तार्किक संरचनेची पुनर्रचना करणे
(D) भाषेच्या व्याकरणीय आकारांचा वेध घेणे

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



34. According to Ryle, the error regarding categories can be avoided by identifying the :
    (A) Difference in linguistic form of expressions
    (B) Difference in logical form of expressions
    (C) Difference in the meaning of expressions
    (D) Mistake in the application of syntactical rules

35. Moore uses the phrase 'things which are to be met with in space' :
    (A) To defend the philosophy of common sense
    (B) To refute idealism
    (C) To prove an external world
    (D) To explain the distinction between sense and reference

36. According to Husserl, the task of Phenomenology is :
    (A) To describe facts
    (B) To analyze presuppositions of knowledge
    (C) To intuit the relation between object the intentional act
    (D) To explain how object is constituted in knowing act

34. राईलच्या मतानुसार .......... जाणून घेऊन कोटीप्रमाद टाळता येऊ शकतील.
    (A) अभिव्यक्तींच्या भाषिक आकारांतील फरक
    (B) अभिव्यक्तींच्या तार्किक आकारांतील फरक
    (C) अभिव्यक्तींच्या अर्थांमधील फरक
    (D) वाक्यसंरचनेच्या नियमांच्या उपयोजनातील प्रमाद

35. "अवकाशात एकत्र आढळून येणाऱ्या वस्तू" या शब्दप्रयोगाचा वापर मूरने .......... यासाठी केला आहे.
    (A) धादान्त मताच्या तत्वज्ञानाचे समर्थन
    (B) चिद्वादाचे खंडन
    (C) बाह्य जगाची सिद्धी
    (D) अर्थ व निर्देश यांतील फरकाचे स्पष्टीकरण

36. हुसर्लच्या मतानुसार, मानसघटनाशास्त्राचे कार्य :
    (A) तथ्यांचे वर्णन करणे
    (B) ज्ञानाच्या गृहीतत्त्वांचे विश्लेषण करणे
    (C) वस्तू व विषयलक्षी कृती यांतील संबंधाची प्रचिती घेणे
    (D) ज्ञानाच्या कृतीमध्ये ज्ञेय विषयाची घडण कशी होते, हे स्पष्ट करणे

www.prepp.in
Prepp
Your Personal Exams Guide



37. In Kierkegaard's philosophy, Christianity turns out to be :
    (A) Unreasonable life of faith
    (B) Rational way of life
    (C) Truly ethical way of life
    (D) Reasonable life of faith

38. Merleau Ponty's phenomenology is an attempt :
    (A) To explore the basic structure of pre-given world
    (B) To explore the basic structure of world of sense-data
    (C) To explore the basic structure of world accessed in privileged way
    (D) To explore the basic structure of world accessed in objective way

39. According to William James, religious beliefs are justified because they are :
    (A) Grounded in experience and are verifiable
    (B) Grounded in experience but are not verifiable
    (C) Grounded in reason and can be deduced from the belief in God
    (D) Grounded in reason but cannot be deduced from the belief in God

37. किर्केगार्डच्या तत्त्वज्ञानानुसार, ख्रिश्चनधर्म हा ········· ठरतो.
    (A) निष्ठाधारित तर्कविरोधी जीवन
    (B) विवेकनिष्ठ जीवनमार्ग
    (C) जीवनाचा खराखुरा नैतिक मार्ग
    (D) निष्ठाधारित तर्कसंगत जीवन

38. मोर्ले पॉन्टीचे मानसघटनाशास्त्र ·········· याचा प्रयत्न करते.
    (A) पूर्वदत्त जगाच्या मूलभूत रचनेचे अन्वेषण
    (B) वेदनदत्त-प्राप्त जगाच्या मूलभूत रचनेचे अन्वेषण
    (C) अग्रमाने प्राप्त झालेल्या जगाच्या मूलभूत रचनेचे अन्वेषण
    (D) वस्तुनिष्ठ मार्गाने प्राप्त झालेल्या जगाच्या मूलभूत स्वरूपाचे अन्वेषण

39. विल्यम जेम्सच्या मतानुसार धार्मिक धारणा समर्थनप्राप्त असतात, कारण त्या :
    (A) अनुभवमूलक व प्रचितीक्षम असतात
    (B) अनुभवमूलक असतात पण प्रचितीक्षम नसतात
    (C) तर्कबुद्धिमूलक असतात व ईश्वरावरील श्रद्धेपासून निगमित होऊ शकतात
    (D) तर्कबुद्धिमूलक असतात पण ईश्वरावरील श्रद्धेपासून निगमित करता येत नाहीत

www.prepp.in



40. Who among the following said that 'Nothing counts as justification unless by reference to what we already accept' ?

(A) William James

(B) Richard Rorty

(C) Frederick Nietzsche

(D) Immanuel Levinas

41. The component principles of Foreign policy, according to Kautilya are :

(A) Five

(B) Six

(C) Two

(D) One

42. According to Kautilya, the factor regarded as most important in the structure of state.

(A) Kosa

(B) Guru

(C) Swami

(D) Bhumi

40. "आपण आधी जे स्वीकारले आहे त्याच्या संदर्भाशिवाय कशालाही 'समर्थन' मानता येणार नाही" हे मत पुढीलपैकी कोणाचे आहे ?

(A) विल्यम जेम्स

(B) रिचर्ड रॉर्टी

(C) फ्रेडरिक नित्शे

(D) इमॅन्युऐल लेविनास

41. कौटिल्याच्या मतानुसार परराष्ट्र-धोरणात अंतर्भूत असलेल्या तत्वांची संख्या हे आहे :

(A) पाच

(B) सहा

(C) दोन

(D) एक

42. कौटिल्याच्या मतानुसार, राज्याच्या रचनेतील सर्वात महत्त्वाचा घटक हे आहे :

(A) कोष

(B) गुरू

(C) स्वामी

(D) भूमी

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



43. The Sarvodaya movement emphasizes upon :
   (A) economic equality
   (B) equal opportunity
   (C) welfare of all
   (D) social equality

44. The number of administrative departments according to Kautilya are :
   (A) Seven
   (B) Eight
   (C) Nine
   (D) Ten

45. Which of the following statements is true with reference to Gandhi's understanding of swadeshi ?
   (A) Swadeshi is swadharma applied to one's immediate environment
   (B) Swadeshi and satyagraha are not linked together
   (C) Swadeshi and ahimsa are not linked together
   (D) The law of swadeshi is not natural, it must be cultivated with perseverance

43. सर्वोदय चळवळीचा भर यावर आहे :
   (A) आर्थिक समानता
   (B) समान संधी
   (C) सर्वांचे कल्याण
   (D) सामाजिक समानता

44. कौटिल्याच्या मतानुसार प्रशासकीय विभागांची संख्या :
   (A) सात
   (B) आठ
   (C) नऊ
   (D) दहा

45. गांधींच्या 'स्वदेशी'च्या आकलनाबाबत पुढीलपैकी कोणते विधान सत्य आहे ?
   (A) स्वदेशी म्हणजे व्यक्तीच्या नजीकच्या पर्यावरणाला लागू होणारा स्वधर्म
   (B) स्वदेशी व सत्याग्रह यांचा परस्परांशी संबंध नाही
   (C) स्वदेशी व अहिंसा यांचा परस्परांशी संबंध नाही
   (D) स्वदेशीचा नियम नैसर्गिक नाही, त्याची प्रयत्नाने मशागत करावी लागते

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



46. The punishment for the offence, according to Kautilya, should be :
    (A) Tikshna
    (B) Mrudu
    (C) Yatharha
    (D) Avyakhyeya

47. Which of the following is not characteristic of a Satyagrahi according to Gandhi ?
    (A) a satyagrahi does not inflict pain on the adversary
    (B) a satyagrahi does not seek the destruction of the adversary
    (C) a satyagrahi may resort to firearms only to deter the adversary
    (D) a satyagrahi does not renounce truth even unto death

48. According to Bhishma, the important things in the life of an individual are :
    (A) First king, then wife and lastly property
    (B) First property, then wife and lastly king
    (C) First wife, then property and lastly king
    (D) First king, then property and lastly wife

46. कौटिल्याच्या मतानुसार गुन्ह्याला दिला जाणारा दंड असा असावा :
    (A) तीक्ष्ण
    (B) मृदू
    (C) यथार्ह
    (D) अव्याख्येय

47. गांधींच्या मतानुसार पुढीलपैकी कोणते सत्याग्रहीचे वैशिष्टय नाही ?
    (A) सत्याग्रही आपल्या विरोधकाला दु:ख देत नाही
    (B) सत्याग्रही आपल्या विरोधकाचा नाश इच्छित नाही
    (C) सत्याग्रही केवळ आपल्या विरोधकाला परावृत्त करण्यासाठीचे शस्त्रांचा वापर करतो
    (D) सत्याग्रही मृत्युपर्यंत सत्याची कास सोडत नाही

48. भीष्मांच्या मतानुसार व्यक्तीच्या आयुष्यातील सर्वात महत्त्वाच्या बाबी :
    (A) प्रथम राजा, मग पत्नी व अंतिम मालमत्ता
    (B) प्रथम मालमत्ता मग पत्नी व अंतिम राजा
    (C) प्रथम पत्नी, मग मालमत्ता व अंतिम राजा
    (D) प्रथम राजा, मग मालमत्ता व अंतिम पत्नी

Prepp
Your Personal Exams Guide



49. According to Bhishma, the supreme among the dharmas is :
    (A) Nitidharma
    (B) Brahmanadharma
    (C) Rajadharma
    (D) Mokshadharma

50. According to Kamandaka :
    (A) Both king and state are protected by God
    (B) King is responsible for the security of the state
    (C) King is responsible for the stability of state
    (D) King is responsible for security and stability of the state

51. According to Will Kymlicka, one of the most pressing global issues of constitutional design concerns the status and treatment of :
    (A) Ethnocultural minorities
    (B) Women and people of other gender
    (C) People of lower races and castes
    (D) Jews

49. भीष्मांच्या मतानुसार सर्वश्रेष्ठ धर्म म्हणजे :
    (A) नीतिधर्म
    (B) ब्राह्मणधर्म
    (C) राजधर्म
    (D) मोक्षधर्म

50. कामंदकाच्या मतानुसार :
    (A) राजा व राज्य या दोहोंचे रक्षण ईश्वर करतो
    (B) राज्याच्या सुरक्षेसाठी राजा जबाबदार आहे
    (C) राज्याच्या स्थैर्यासाठी राजा जबाबदार आहे
    (D) राज्याची सुरक्षा व स्थैर्य या दोन्हीची जबाबदारी राजावर आहे

51. विल किम्लिका यांच्या मते, संवैधानिक रचनेशी संबंधित कळीच्या वैश्विक प्रश्नांचा संबंध .......... यांच्या दर्जा व दिली जाणारी वागणूक यांच्याशी असतो.
    (A) वांशिक-सांस्कृतिक अल्पसंख्यांक
    (B) स्त्रिया व अन्यलिंगी व्यक्ती
    (C) हीन वंश व जातीचे लोक
    (D) ज्यू

www.prepp.in
Prepp
Your Personal Exams Guide



52. Radical Feminism holds that men as group dominate women through :

(A) Patriarchy

(B) Masculinity

(C) Male violence and power

(D) Patriarchal codes of state

53. Rousseau calls the public person, so formed by the union of all other persons as :

(A) Contractual society

(B) Republic state

(C) Sovereign state

(D) Body politic

54. Charles Taylor argues that the development of the modern notion of identity has given rise to a politics of :

(A) Recognition

(B) Difference

(C) Reconciliation

(D) Emotionalism

55. Robert Nozick's entitlement theory of justice is based in .......... principles.

(A) End result

(B) End state

(C) Historical

(D) Unhistorical

52. जहाल स्त्रीवादाची अशी मान्यता आहे की पुरुष एक समूह या स्वरूपात स्त्रियांवर वर्चस्व गाजवतात, ते याद्वारा :

(A) पितृसत्ता

(B) पुरुषत्व

(C) पुरुषी हिंसा आणि सत्ता

(D) राज्यांच्या पुरुषसत्ताक संहिता

53. रूसो, इतर सर्व व्यक्तींच्या संघटनाद्वारे निर्माण होणाऱ्या सार्वजनिक व्यक्तीला असे म्हणतात :

(A) कराराधिष्ठित समाज

(B) प्रजासत्ताक राज्य

(C) सार्वभौम राज्य

(D) राज्यरूपी शरीर

54. चार्ल्स टेलर असे प्रतिपादन करतात की अस्मितेच्या आधुनिक संकल्पनेच्या विकासामुळे कोणते राजकारण उदयास आले ?

(A) मान्यता

(B) भेद

(C) समझोता

(D) भावनिकतावाद

55. रॉबर्ट नॉझिक यांची न्यायविषयक हक्क उपपत्ती ही खालील तत्त्वांवर आधारित आहे :

(A) अंतिम परिणाम

(B) अंतिम अवस्था

(C) ऐतिहासिक

(D) अनैतिहासिक

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



56. Marx envisions a communist society as one where human beings will be undistorted by :

(A) Only possessiveness

(B) Only Acquisitiveness

(C) Possessiveness and Acquisitiveness

(D) Exchange

57. Denise Thompson is of the view that the characterization of feminism into liberal, socialist, radical etc. disguises the relations of :

(A) Society

(B) Men *vs* women

(C) Matriarchy

(D) Power involved

58. In the Universalism *vs* particularism debate, MacIntyre attempts to steer clear from the charge of :

(A) Theologism

(B) Nihilism

(C) Absolutism

(D) Relativism

56. मार्क्स अशा साम्यवादी समाजाची कल्पना करतो की ज्यात माणसांना याने विकृत केले जाणार नाही :

(A) केवळ मालकी हक्काची भावना

(B) केवळ मिळवण्याची भावना

(C) मालकी हक्काची तसेच मिळवण्याची भावना

(D) विनिमय

57. डेनीज थॉमसन यांचे मत असे आहे की स्त्रीवादाला उदारमतवादी, समाजवादी, मूलगामी अशी विशेषणे लावल्याने हे संबंध झाकले जातात :

(A) समाजाचे संबंध

(B) पुरुष विरुद्ध स्त्री हे संबंध

(C) मातृसत्तेचे संबंध

(D) अनुस्यूत सत्तासंबंध

58. सामान्यवाद विरुद्ध विशिष्टवाद या वादात मॅकिंटायर हे खालील आरोपापासून आपला बचाव करतात :

(A) दैवतशास्त्रवाद

(B) शून्यवाद

(C) निरुपाधिकतावाद

(D) सापेक्षतावाद

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



59. Amartya Sen argues that the capability approach does not propose any specific formula and merely points to ............ in judging and comparing overall individual advantages.

(A) Actual opportunity

(B) Informational focus

(C) Ends

(D) Justice

60. Marx refers to capitalist society as :

(A) Bourgeois society

(B) Middle class society

(C) Asiatic society

(D) Industrial society

61. An argument in which the conclusion follows necessary from the premises is a ............

(A) Valid deductive argument

(B) Invalid deductive argument

(C) Inductive argument

(D) Simple enumeration

59. अमर्त्यसेन असा दावा करतात की क्षमतावादी दृष्टिकोन कोणतेही विशिष्ट सूत्र सादर करत नाही, तर एकूण वैयक्तिक फायद्यांची निश्चिती व तुलना करण्याच्या बाबतीत याकडे निर्देश करतो :

(A) प्रत्यक्षातील संधी

(B) माहितीचा रोख

(C) उद्दिष्टे

(D) न्याय

60. मार्क्स भांडवलशाही समाजाचा निर्देश असा करतो :

(A) बूर्झ्वा समाज

(B) मध्यमवर्गीय समाज

(C) आशियाई समाज

(D) औद्योगिक समाज

61. ज्या युक्तिवादात आधार विधानांतून निष्कर्ष अनिवार्यपणे निष्पादित होतो तो आहे .......

(A) वैध नैगमनिक युक्तिवाद

(B) अवैध नैगमनिक युक्तिवाद

(C) नैगमनिक युक्तिवाद

(D) सरल गणण

www.prepp.in



62. Which of the following is *incorrect* with reference to the law of indentity ?

(A) P ⊃ P

(B) Everything is modification of itself

(C) Everything is what it is

(D) Everything is identical with itself

63. A proposition that does not contain any other proposition as a component, is called :

(A) Simple proposition

(B) Compound proposition

(C) Complex proposition

(D) Complicate proposition

64. If 'I' proposition is false, the truth value of 'A', 'E' and 'O' propositions are respectively :

(A) T, F, T

(B) F, F, T

(C) F, T, T

(D) T, T, F

62. तादात्म्याच्या नियमासंदर्भात पुढीलपैकी कोणते विधान असत्य आहे ?

(A) P ⊃ P

(B) प्रत्येक गोष्ट स्वत:चेच परिवर्तन असते

(C) प्रत्येक गोष्ट तीच असते, जी ती असते

(D) प्रत्येक गोष्ट स्वत:शीच तादात्म्य असते

63. ज्या विधानात इतर विधान घटक म्हणून समाविष्ट नसते त्याला असे म्हणतात :

(A) सरल विधान

(B) मिश्र विधान

(C) संमिश्र विधान

(D) गुंतागुंतीचे विधान

64. जर 'I' विधान असत्य असेल तर 'A', 'E' आणि 'O' विधानांचे सत्यतामूल्य अनुक्रमे हे असते :

(A) T, F, T

(B) F, F, T

(C) F, T, T

(D) T, T, F

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



65. Which of the codes given below contains only the correct statements ?

(*i*) Venn diagram is a method of testing the validity of categorical syllogism

(*ii*) Venn diagram is not a method of testing the invalidity of categorical syllogism

(*iii*) In Venn diagram method the three overlapping circles are drawn to represent two premises and a conclusion

(*iv*) The three circle are label as S, P, M

**Codes :**

(A) (*i*), (*ii*), (*iii*)

(B) (*i*), (*iii*), (*iv*)

(C) (*i*), (*ii*), (*iv*)

(D) (*ii*), (*iii*), (*iv*)

66. Recognized the rule expressed by the following argument :

$(p \supset q) \ . \ (r \supset s)$

$p \vee r$

$\therefore \quad q \vee r$

(A) Conjunction

(B) Disjunctive Syllogism

(C) Addition

(D) Constructive Dilemma

65. पुढे दिलेल्या संकेतांपैकी कोणामध्ये फक्त अचूक विधानांचा समावेश आहे ?

(*i*) व्हेन आकृती ही निरूपाधिक संविधानाची वैधता तपासण्याची पद्धती आहे

(*ii*) व्हेन आकृती ही निरूपाधिक संविधानाची अवैधता तपासण्याची पद्धती नाही

(*iii*) व्हेन आकृती पद्धतीमध्ये परस्परांना छेदणारी वर्तुळे काढली जातात, जी दोन आधारविधाने आणि निष्कर्षाचे प्रतिनिधित्व करतात

(*iv*) तीन वर्तुळांना 'S', 'P', 'M' अशी नावे दिली जातात :

**संकेतांक :**

(A) (*i*), (*ii*), (*iii*)

(B) (*i*), (*iii*), (*iv*)

(C) (*i*), (*ii*), (*iv*)

(D) (*ii*), (*iii*), (*iv*)

66. पुढील युक्तिवादातील नियम ओळखा :

$(p \supset q) \ . \ (r \supset s)$

$p \vee r$

$\therefore \quad q \vee r$

(A) संधी

(B) वैकल्पिक संवाक्य

(C) वृद्धीकरण

(D) विधायक उभयापत्ती

Prepp
Your Personal Exams Guide



67. Which of the following is a Tautology ?

(A) $[(r \supset s) . (s \supset t)] \supset (r \supset t)$

(B) $[(r . s) . (s . t)] \supset (r \supset t)$

(C) $[(p \supset q) . q] \supset p$

(D) $(p \supset q) \supset (\sim p \supset \sim q)$

68. A method of obtaining propositions from propositional functions is/are :

(A) Generalization and enumeration

(B) Instantiation only

(C) Enumeration only

(D) Both Generalization and Instantiation

69. Identify the fallacy committed in the following argument :

"If Hume is an atheist, then Spinoza is an atheist also. Spinoza is an atheist. Therefore, Hume is also an atheist."

(A) Fallacy of composition

(B) Fallacy of Affirming the concequent

(C) Fallacy of Denying the antecedent

(D) Fallacy of Division

67. पुढीलपैकी कोणता विधानबंध सर्वतः सत्य आहे ?

(A) $[(r \supset s) . (s \supset t)] \supset (r \supset t)$

(B) $[(r . s) . (s . t)] \supset (r \supset t)$

(C) $[(p \supset q) . q] \supset p$

(D) $(p \supset q) \supset (\sim p \supset \sim q)$

68. विधान फलनापासून विधान प्राप्त करण्याची/करणाच्या पद्धती म्हणजे :

(A) सामान्यीकरण आणि गणना

(B) फक्त उदाहरणीकरण

(C) फक्त सामान्यीकरण

(D) सामान्यीकरण आणि उदाहरणीकरण दोन्ही

69. पुढील युक्तिवादात झालेला तर्कदोष ओळखा :

"जर ह्यूम निरीश्वरवादी असेल, तर स्पिनोझासुद्धा निरीश्वरवादी आहे. स्पिनोझा निरीश्वरवादी आहे. म्हणून ह्यूम सुद्धा निरीश्वरवादी आहे".

(A) समूहाभास

(B) उत्तरांग स्वीकार तर्कदोष

(C) पूर्वांग निषेध तर्कदोष

(D) विभाजन तर्कदोष

70. Correct symbolization of the following statement is ..........

"Only citizens are voters". (C$x$, V$x$)

(A) (X) (C$x$ ⊃ V$x$)

(B) (X) (C$x$ . V$x$)

(C) (∃$x$) (C$x$ . V$x$)

(D) (X) (V$x$ ⊃ C$x$)

71. Which of the following provides the best reason against ethical theories and for the need of applied ethics ?

(A) Theoretical ethics is inadequate to solve problems of day-to-day life

(B) Theoretical ethics depends on how well one can know universal moral laws

(C) Theoretical ethics is highly abstract, reductionist and deductive in nature

(D) Theoretical ethics is ambiguous

72. Ethical dilemmas arise in the use of technologies primarily because :

(A) Technologies are useful to humans

(B) Technologies are value neutral

(C) The way in which technologies are used may be ethically problematic

(D) Technologies shape our understanding of the world

70. पुढील विधानाचे अचूक चिन्हांकन हे आहे :

"फक्त नागरिकच मतदार आहेत" (C$x$, V$x$)

(A) (X) (C$x$ ⊃ V$x$)

(B) (X) (C$x$ . V$x$)

(C) (∃$x$) (C$x$ . V$x$)

(D) (X) (V$x$ ⊃ C$x$)

71. औपपत्तिक नीतिशास्त्राच्या विरोधातील व उपयोजित नीतिशास्त्राची गरज दर्शविणारे खालीलपैकी कोणते कारण सर्वात योग्य आहे ?

(A) औपपत्तिक नीतिशास्त्र रोजच्या आयुष्यातील प्रश्न सोडविण्यास गैरलागू असते

(B) आपल्याला वैश्विक नीतिनियमांचे किती ज्ञान आहे ह्यावर औपपत्तिक नीतिशास्त्र अवलंबून असते

(C) औपपत्तिक नीतिशास्त्र अत्यंत अमूर्त, विलयनात्मक व नैगमनिक असते

(D) औपपत्तिक नीतिशास्त्र संदिग्ध असते

72. तंत्रज्ञानाच्या वापरामध्ये नैतिक द्वंद्वसमस्या उद्भवतात कारण :

(A) तंत्रज्ञान मानवाला उपयोगी असते

(B) तंत्रज्ञान हे मूल्यनिरपेक्ष असते

(C) तंत्रज्ञानाचा वापर कशाप्रकारे केला जातो हे नैतिकदृष्ट्या समस्येचे असू शकते

(D) जगाविषयीच्या आपल्या समजुती तंत्रज्ञानाद्वारे आकारास येतात.

Prepp
Your Personal Exams Guide



73. The ethics of Information Technology comprises of :

(A) the study of methods of generating information

(B) the study of issues arising out of the use of information and development of electronic technologies

(C) the study of who has right to information

(D) the study of who has right to technology of information

74. Is it morally acceptable for a physician to do things to a patient for their benefit without their informed consent ? This question represents the issue of :

(A) confidentiality

(B) honesty

(C) deceit

(D) paternalism

73. माहिती तंत्रज्ञानाच्या नीतिशास्त्रात .......... चा समावेश होतो.

(A) माहितीची निर्मिती करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या पद्धीतींचा अभ्यास

(B) माहितीचा वापर व इलेक्ट्रॉनिक तंत्रज्ञानाची निर्मिती यातून निर्माण होणाऱ्या समस्यांचा अभ्यास

(C) माहितीचा अधिकार कोणाला असावा याचा अभ्यास

(D) माहिती तंत्रज्ञानाचा अधिकार कोणाला असावा याचा अभ्यास

74. वैद्याने रुग्णाच्या हितासाठी रुग्णाच्या माहितीपूर्ण परवानगीशिवाय काही करणे नैतिकदृष्ट्या स्वीकार्य आहे का ?' हा प्रश्न ......... विषयक समस्या दर्शविते.

(A) गोपनीयता

(B) प्रामाणिकता

(C) फसवणूक

(D) पैतृकतावाद

www.prepp.in



75. Which of the following schools of thought holds that it is particular cases and decisions about particular cases that are foundational for bioethics rather than principles ?
   (A) Casuistry
   (B) Feminist ethics
   (C) Virtue ethics
   (D) Deontology

76. One of the premises in an argument against euthanasia is :
   (A) deliberate killing is always wrong
   (B) deliberate killing of innocent persons is always wrong
   (C) killing is always wrong
   (D) deliberate killing is not always wrong

77. The belief that human beings should look after the world as guardians, in the way God wants them to is known as :
   (A) Biocentrism
   (B) Ecocentrism
   (C) Anthropocentrism
   (D) Theocentrism

75. 'विशिष्ट प्रकरणे व विशिष्ट प्रकरणांविषयीचे निर्णय हे जैवनीतिशास्त्रासाठी पायाभूत असतात, तत्त्वे पायाभूत असत नाहीत' ही धारणा खालीलपैकी कोणत्या विचारप्रवाहाची आहे ?
   (A) किंकर्तव्यमीमांसा
   (B) स्त्रीवादी नीतिमीमांसा
   (C) सद्‌गुणवादी नीतिमीमांसा
   (D) कर्तव्यवादी नीतिमीमांसा

76. दयामरणाची टीका करणाऱ्या युक्तिवादातील एक आधारविधान म्हणजे :
   (A) जाणीवपूर्वक हत्या करणे नेहमीच चुकीचे असते
   (B) निर्दोष व्यक्तींची जाणीवपूर्वक हत्या करणे नेहमीच चुकीचे असते
   (C) हत्या करणे नेहमीच चुकीचे असते
   (D) जाणीवपूर्वक हत्या करणे नेहमीच चुकीचे नसते

77. मानवाने ईश्वराच्या इच्छेनुसार जगाची देखरेख, जगाचे पालक म्हणून करावी ह्या धारणेला .......... असे म्हणतात.
   (A) जैवकेंद्रिततावाद
   (B) पर्यावरण केंद्रिततावाद
   (C) मानवकेंद्रिततावाद
   (D) ईश्वरकेंद्रिततावाद

www.prepp.in
Prepp
Your Personal Exams Guide



78. The value that something has for what it is, independent of whether anyone values it or not is known as :

(A) Intrinsic value
(B) Instrumental value
(C) Subjective value
(D) Aesthetic value

79. What ethical principle is violated when an organization fails to secure and protect individuals personal information ?

(A) Autonomy
(B) Confidentiality
(C) Freedom
(D) Non-maleficence

80. One of the most systematized modalities of philosophical counseling is :

(A) Existential therapy
(B) Logic-based therapy
(C) Rational emotive behavior therapy
(D) Cognitive behavior therapy

78. एखाद्या वस्तूचे स्वत:चे असे मूल्य, जे इतर कोणी त्याचे मूल्यमापन करते की नाही यावर अवलंबून नसते, त्यास ......... असे म्हणतात.

(A) साध्य मूल्य
(B) साधन मूल्य
(C) व्यक्तिनिष्ठ मूल्य
(D) सौंदर्यशास्त्रीय मूल्य

79. एखादी संस्था जेव्हा व्यक्तीची खासगी माहिती सुरक्षित ठेवण्यास असमर्थ ठरते तेव्हा खालीलपैकी कोणत्या नैतिक तत्त्वाचे उल्लंघन होते ?

(A) स्वायत्तता
(B) गोपनीयता
(C) स्वातंत्र्य
(D) अहानिकारकता

80. ......... ही तात्त्विक समुपदेशनाच्या सर्वात प्रणालीबद्ध पद्धतींपैकी एक आहे.

(A) अस्तित्ववादी चिकित्सा
(B) तर्काधिष्ठित चिकित्सा
(C) तर्कशुद्ध भावनिक वर्तन चिकित्सा
(D) संज्ञानात्मक वर्तन चिकित्सा

81. Match the pairs :

**System of philosophy**

(*i*) Bhāṭṭa-Mīmāṃsā

(*ii*) Prābhākara-Mīmāṃsā

(*iii*) Advaita-Vedānta

(*iv*) Nyāya

**The theory of Error accepted by the system**

(*a*) Anirvacanīyakhyāti

(*b*) Viparītakhyāti

(*c*) Anyāthakhyāti

(*d*) Akhyāti

Choose the correct option :

| | (*i*) | (*ii*) | (*iii*) | (*iv*) |
|---|---|---|---|---|
| (A) | (*d*) | (*c*) | (*b*) | (*a*) |
| (B) | (*b*) | (*d*) | (*a*) | (*c*) |
| (C) | (*a*) | (*b*) | (*d*) | (*c*) |
| (D) | (*b*) | (*a*) | (*c*) | (*d*) |

82. "By knowing one combination of clay, everything made of clay is known. Name and form is just linguistic expression and a transformation. Clay is the truth" This metaphor of clay is used for explaining Brahman as the material cause in the following Upaniṣad :

(A) Īśa

(B) Kaṭha

(C) Bṛhadāraṇyaka

(D) Chāndogya

81. जोड्या जुळवा :

**दर्शन**

(*i*) भाट्ट–मीमांसा

(*ii*) प्राभाकर–मीमांसा

(*iii*) अद्वैतवेदान्त

(*iv*) न्याय

**दर्शनाने स्वीकारलेली भ्रमविषयक उपपत्ती**

(*a*) अनिर्वचनीयख्याती

(*b*) विपरीतख्याती

(*c*) अन्यथाख्याती

(*d*) अख्याती

बरोबर पर्याय निवडा :

| | (*i*) | (*ii*) | (*iii*) | (*iv*) |
|---|---|---|---|---|
| (A) | (*d*) | (*c*) | (*b*) | (*a*) |
| (B) | (*b*) | (*d*) | (*a*) | (*c*) |
| (C) | (*a*) | (*b*) | (*d*) | (*c*) |
| (D) | (*b*) | (*a*) | (*c*) | (*d*) |

82. "मातीचा एक पिंड जाणल्याने मातीचे बनलेले सर्व काही जाणले जाते. नामरूप हे केवळ भाषिक अभिव्यक्ती व विकार असते. माती एवढेच खरे असते." ब्रह्म हे उपादानकारण आहे हे स्पष्ट करण्यासाठी हे मातीचे रूपक खालील उपनिषदात वापरले आहे :

(A) ईश

(B) कठ

(C) बृहदारण्यक

(D) छांदोग्य

83. According to Cārvāka materialism :
(A) Consciousness is identical with matter
(B) Only matter exists, consciousness does not
(C) Consciousness emerges from matter
(D) Matter and consciousness produce each other

84. The correct order of the first four links in the 12 linked chain of Dependent Origination is :
(A) Avijjā, Saṅkhāra, Viññāṇa, Nāmarūpa
(B) Viññāṇa, Saṅkhāra, Avijjā, Nāmarūpa
(C) Avijjā, Nāmarūpa, Viññāṇa,Saṅkhāra
(D) Avijjā, Saṅkhāra, Nāmarūpa, Viññāṇa

85. The specific sense in which the term karma is used in Jainism is :
(A) Volition, mental action
(B) A sort of minute particle of matter
(C) Motion
(D) Action ejoined or prohibited by religious scriptures

83. चार्वाकांच्या जडवादानुसार :
(A) जाणीव ही जडतत्त्वाशी एकरूप असते
(B) फक्त जडतत्त्व अस्तित्वात असते, जाणीव नसते
(C) जाणीव जडद्रव्यापासून उत्पन्न होते
(D) जडद्रव्य आणि जाणीव एकमेकाला उत्पन्न करतात

84. प्रतीत्यसमुत्पादाच्या बारा दुव्यांच्या साखळीतील पहित्या चार दुव्यांचा बरोबर क्रम पुढीलप्रमाणे आहे :
(A) अविज्जा, संखार, विञ्ञाण, नामरूप
(B) विञ्ञाण, संखार, अविज्जा, नामरूप
(C) अविज्जा, नामरूप, विञ्ञाण, संखार
(D) अविज्जा, संखार, नामरूप विञ्ञाण

85. जैनदर्शनात 'कर्म' ही संज्ञा ज्या विशिष्ट अर्थाने वापरली जाते, तो अर्थ आहे :
(A) चेतना, मानसिक कृती
(B) जडतत्त्वाचा एक प्रकारचा सूक्ष्म कण
(C) गती
(D) धर्मग्रंथांनी विहित किंवा निषिद्ध ठरवलेले कर्म

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



86. According to the Sāṅkhya system in Sāṅkhyakārikā, the group of eleven consisting of five sense organs, five motor organs and manas arises directly from :

(A) Ahaṃkāra as a whole

(B) Tāmasa (Bhūtādi) part of Ahaṃkāra

(C) Rājasa (Taijasa) part of Ahaṃkāra

(D) Sāttvika (Vaikṛta) part of Ahaṃkāra

87. Īśvara according to the Yogasūtra of Patañjali is the Puruṣa :

(A) Who possesses all good qualities and is the object of worship by all

(B) Who is identical with the individual souls of all beings

(C) Untouched by afflictions, actions, their fruitions and latent impressions

(D) Omniscient and omnipotent creator of the world

88. According to the early Nyāya definition of perception, perceptual knowledge arises from the contact between :

(A) Sense organ and object

(B) Self and object

(C) Mind and object

(D) Self and sense organ

86. सांख्यकारिकेतील सांख्यदर्शनानुसार पाच ज्ञानेंद्रिये, पाच कर्मेंद्रिये आणि मन यांनी बनलेला अकरांचा समुदाय खालीलांपासून साक्षात उत्पन्न होतो :

(A) एकूण अहंकार

(B) अहंकाराचा तामस (भूतादि) भाग

(C) अहंकाराचा राजस (तैजस) भाग

(D) अहंकाराचा सात्त्विक (वैकृत) भाग

87. पतंजलींच्या योगसूत्रानुसार ईश्वर म्हणजे असा 'पुरुष' की जो :

(A) सर्व सद्गुणांचा धारक असून सर्वांच्या पूजेचा विषय असतो

(B) सर्व जीवांच्या व्यक्तिगत आत्म्यांशी एकरूप असतो

(C) क्लेश, कर्म, विपाक आणि आशय यांनी स्पर्शिलेला नसतो

(D) जगाचा सर्वज्ञ आणि सर्वशक्तिमान निर्माता असतो

88. प्राचीन न्यायातील प्रत्यक्षाच्या लक्षणानुसार प्रत्यक्षज्ञान हे पुढील गोष्टींच्या संनिकर्षापासून उत्पन्न होते :

(A) ज्ञानेंद्रिय आणि विषय

(B) आत्मा आणि विषय

(C) मन आणि विषय

(D) आत्मा आणि ज्ञानेंद्रिय

89. According to Vaiśeṣikas the relation called Samavāya does not obtain between :
   (A) Substance and its qualities
   (B) Two atoms of a substance
   (C) Parts and whole
   (D) Particulars and universals

90. According to Prābhākara - Mīmāṃsā absence of a pot from the floor :
   (A) Does not exist, only the empty floor exists
   (B) Exists and can be known through perception
   (C) Exists and can be known through non-apprehension
   (D) Exists and can be known through inference

91. Match the following and mark the *correct* code :

**List I**

(*a*) Theory of atoms
(*b*) Change is unreal
(*c*) Earth is cylindrical
(*d*) Homo Mensura

**List II**

(*i*) Parmenides
(*ii*) Protagoras
(*iii*) Democritus
(*iv*) Anaximander

**Codes :**

| | (*a*) | (*b*) | (*c*) | (*d*) |
|---|---|---|---|---|
| (A) | (*iii*) | (*ii*) | (*iv*) | (*i*) |
| (B) | (*iii*) | (*i*) | (*iv*) | (*ii*) |
| (C) | (*i*) | (*iii*) | (*ii*) | (*iv*) |
| (D) | (*iv*) | (*ii*) | (*iii*) | (*i*) |

89. वैशेषिकांच्या मतानुसार समवाय हा संबंध पुढील दोघांमधे आढळत नाही :
   (A) द्रव्य आणि त्याचे गुण
   (B) एका द्रव्याचे दोन परमाणू
   (C) अवयव आणि अवयवी
   (D) व्यक्ती आणि सामान्ये

90. प्राभाकर मीमांसेनुसार जमिनीवर घटाचा अभाव :
   (A) अस्तित्वात नसतो, नुसती रिकामी जमीन अस्तित्वात असते
   (B) अस्तित्वात असतो आणि त्याचे ज्ञान प्रत्यक्षाने होऊ शकते
   (C) अस्तित्वात असतो आणि त्याचे ज्ञान अनुपलब्धीने होऊ शकते
   (D) अस्तित्वात असतो आणि त्याचे ज्ञान अनुमानाने होऊ शकते

91. जोड्या जुळवा आणि योग्य संकेतांक निवडा :

**सूची I**

(*a*) अणुवादाची उपपत्ती
(*b*) बदल असत् आहे
(*c*) पृथ्वी दंडगोलाकार आहे
(*d*) होमो मेन्सुरा

**सूची II**

(*i*) पारमेनीडिस
(*ii*) प्रोटागोरस
(*iii*) डेमोक्रिटस्
(*iv*) ॲनाक्झिमँडर

**संकेतांक :**

| | (*a*) | (*b*) | (*c*) | (*d*) |
|---|---|---|---|---|
| (A) | (*iii*) | (*ii*) | (*iv*) | (*i*) |
| (B) | (*iii*) | (*i*) | (*iv*) | (*ii*) |
| (C) | (*i*) | (*iii*) | (*ii*) | (*iv*) |
| (D) | (*iv*) | (*ii*) | (*iii*) | (*i*) |

92. ....... said that "an unexamined life is not worth living"

(A) Socrates

(B) Aristotle

(C) Zeno

(D) Sophists

93. Choose the correct code :

According to Plato parts of soul are :

(*i*) reason

(*ii*) spirit

(*iii*) super-ego

(*iv*) appetite

**Codes :**

(A) (*i*) (*ii*) (*iii*)

(B) (*ii*) (*iii*) (*iv*)

(C) (*i*) (*ii*) (*iv*)

(D) (*i*) (*iii*) (*iv*)

94. Aristotle believed that there are ..... levels of reality.

(A) Three

(B) Four

(C) Two

(D) One

92. "परीक्षण न केलेले जीवन, साथी जगणे नसते". हे ............ ने म्हटले आहे.

(A) सॉक्रेटिस

(B) ॲरिस्टॉटल

(C) झिनो

(D) सोफिस्ट

93. योग्य संकेतांक निवडा :

प्लेटोच्या मते आत्म्याचे तीन विभाग आहेत :

(*i*) बुद्धी

(*ii*) ऊर्जा राग व इतर भावना

(*iii*) सुपर-ईगो

(*iv*) क्षुधा

**संकेतांक :**

(A) (*i*) (*ii*) (*iii*)

(B) (*ii*) (*iii*) (*iv*)

(C) (*i*) (*ii*) (*iv*)

(D) (*i*) (*iii*) (*iv*)

94. ॲरिस्टॉटलच्या मते सत्तेच्या पातळी ......... आहे/आहेत.

(A) तीन

(B) चार

(C) दोन

(D) एक

www.prepp.in
Prepp
Your Personal Exams Guide



95. 'Evil is necessary for enhancement of the greater good.' 'Evil is a privation' of good ? These are the view of :

(A) St. Anselm

(B) St. Augustine

(C) St. Aquinas

(D) St. Paul

96. In Descartes method of doubt, these are .......... steps.

(A) One

(B) Three

(C) Two

(D) Four

97. Being a real unit, each monad contains :

(A) The whole infinity of existence

(B) Physical characteristics

(C) Mind as well as body

(D) Many windows

95. 'दूरित हे चांगुलपणाच्या वृद्धीसाठी आवश्यक असते.' 'दूरित म्हणजे चांगुलपणाचा अभाव' ही मते आहेत :

(A) सेंट ॲन्सेल्म

(B) सेंट ऑगस्टिन

(C) सेंट ॲक्वायनस

(D) सेंट पॉल

96. देकार्तप्रणित संशयाच्या पद्धतीत .......... पायऱ्या आहेत.

(A) एक

(B) तीन

(C) दोन

(D) चार

97. सत् एकक म्हणून प्रत्येक चिदणूमध्ये .......... असते.

(A) अस्तित्वाचे समग्र अनंतत्व

(B) भौतिक वैशिष्ट्ये

(C) मन आणि शरीर

(D) अनेक खिडक्या

98. According to Hume, an example of a judgement concerning relations of ideas is ...............

(A) "The sun will rise tomorrow"

(B) "All bachelers are unmarried"

(C) "Real is rational and rational is real"

(D) "This flower is yellow"

99. Berkeley's thesis concerning universals is :

(A) Theory of ideas

(B) Conceptualism

(C) Nominalism

(D) Family rresemblance

100. Kant's philosophical methodology is :

(A) Analytic

(B) Scientific

(C) Practical

(D) Critical

98. ह्यूमच्या मते, कल्पनांमधील संबंधविषयक निर्णयाचे हे उदाहरण आहे :

(A) "उद्या सूर्योदय होईल"

(B) "सर्व ब्रह्मचारी अविवाहित असतात"

(C) "सत् हे बुद्धिगम्य आहे आणि बुद्धिगम्य हे सत् आहे"

(D) "हे फूल पिवळे आहे"

99. सामान्येविषयक बर्कलेचे मत ......... हे आहे.

(A) कल्पनांचा सिद्धांत

(B) संकल्पनावाद

(C) नामवाद

(D) कुटुंब सादृश्यता

100. कांटची तत्त्वज्ञानात्मक पद्धती हे आहे :

(A) विश्लेषक

(B) विज्ञाननिष्ठ

(C) व्यावहारिक

(D) चिकित्सक

www.prepp.in



**ROUGH WORK**